किल्ले सुधागड

विशाल दळवी

किल्ले सुधागड

विशाल दळवी

ई साहित्य प्रतिष्ठान

किल्ले सुधागड

लेखक व छायाचित्रकार : ©विशाल दळवी.

vshldalvi.639@rediffmail.com

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

©esahity Pratishthan® 2015
प्रकाशन : मार्च २०१५

• हे पुस्तक लेखकाच्या परवानगीने ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध करून दिले आहे.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे विनामूल्य फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

‘भोरपगड’

ऊर्फ

‘किल्ले सुधागड’

श्री शंभो: शिवजातस्य मुद्रा द्यौरिव राजते।

यदंकसेविनी लेखा वर्तते कस्य नोपरि।।

शिवपुत्र, धर्मवीर, परमप्रतापी, महापराक्रमी अश्या सह्याद्रीच्या वाघास,

श्री छत्रपती संभाजी महाराजांस हे पुस्तक सन्मानपूर्वक अर्पण

ट्रेक ग्रुप- गिरीनाद...धी ग्रुप ऑफ ट्रेकर्स

Girinaad....The Grouaaashalgadp Of Trekkers...

ट्रेकर मंडळींपैकी अगदी कमी जणच असतील ज्यांनी सरसगडला भेट दिली नसेल. आणि ज्यांनी भेट दिली असेल त्यांना सरसगडाच्या माथ्यावरून दिसणाऱ्या रांगड्या सुधागडाने भुरळ पडली नसेल तर नवलच!!! काय म्हणता अजूनही तसा योग आला नाही!!! चला तर मग या पुस्तकरूपी यानातून सुधागडावर एक छानसा फेरफटका मारून येऊया आणि ज्यांनी सुधागड अनुभवला आहे त्यांनाही या यानात बसण्याची परवानगी आहे म्हटलं!!!!

महाराष्ट्रातील प्राचीन किल्ल्यांपैकी एक अशी सुधागडाची ओळख आहे. आणि तसे पुरावेही भारतीय पुराणात आढळतात. सुधागडावरील प्रसिद्ध आणि गावकऱ्यांचे आराध्य दैवत असलेल्या भोराई मातेच्या मूर्तीची स्थापना भृगु ऋषींनी केल्याची नोंद पुराणात आढळते. आणखी एक महत्वाचा पुरावा म्हणजे या परिसरात असणारी अतिप्राचीन ठाणाळे लेणी होय. हि लेणी सुमारे २२०० वर्षे जुनी असावीत असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. त्यावरूनच सुधागडाचे वयही तितकेच असावे असे अनुमान निघते. पूर्वी हे दुर्गवैभव भोर संस्थानाच्या अखत्यारीत होते. माथ्यावर असलेल्या भोराई देवीच्या वास्तव्याने त्याकाळी हा गड 'भोरपगड' म्हणून परिचित होता. त्यानंतर १४६३ साली बहामनी सुलतान याने हा किल्ला जिंकाला आणि १६४८ साली शिवाजी महाराजांनी हा किल्ला काबीज करून त्याचे 'सुधागड' असे नामकरण केले. हा किल्ला अतिशय मोठा असल्याने त्याला स्वराज्याच्या राजधानीचा दर्जा द्यावा असे महाराजांच्या मनात होते, परंतु तो मान अखेर रायगडला मिळाला.



सुधागडाची समुद्रसपाटीपासूनची उंची साधारण ६२० मीटर (२०३० फुट) इतकी आहे. सुधागड वरील चढाई हि सोप्या श्रेणीत मोडते. दाट वनराईने आच्छादलेला असल्याने जंगल ट्रेकिंगचा अनुभवही घेता येतो. गिरिदुर्ग प्रकारात मोडणारा हा किल्ला रायगड जिल्ह्यातील 'सुधागड-पाली' तालुक्यात स्थित आहे. गडावर पोचण्यासाठी दोन प्रमुख वाटा आहेत.

१)पाली - भिरा या हमरस्त्यावर ८ किलोमीटरवर पाच्छापूर नावाचे गाव आहे त्या गावातून पुढे काही अंतरावर ठाकूरवाडी हे पायथ्याचे गाव लागते. इथून आपण सुमारे दोन तासाच्या सोप्या चढाईने गडमाथा गाठू शकतो. या मार्गाने जाताना वाटेत एक लोखंडी शिडी लागते. पाच्छापूर गावातूनही एक वाट वर जाते. या दोन्ही वाटा अखेर पाच्छापूर दरवाज्याजवळ जाऊन मिळतात.

२)पाली गावातून १२ किलोमीटरवर असणाऱ्या धोंडसे गावातून पायऱ्यांच्या साहयाने ३ तासात आपण गडमाथा गाठू शकतो. ह्या वाटेने किल्ल्याच्या दिंडी दरवाजातून आपण भोराई देवीच्या मंदिराजवळ येऊन पोचतो. 'तैलबैला' ला भेट देऊन सवाष्णी घाटाने उतरून आपण याच मार्गाने सुधागडावर पोहचू शकतो.

सरसगडच्या माथ्यावरून दोनदा सुधागडाचे दर्शन घेतले होते. पण देवाला दुरून पाहण्यापेक्षा त्याच्या मंदिरात जाऊन दर्शन घेण्यातच खरे सुख असते....नाही का?? अखेर दिवस ठरला ३१ डिसेंबर २०१४ आणि आमची स्वारी निघाली....आम्ही आतूर होतो नवीन वर्षाची सुरवात सुधागडाच्या साक्षीने करण्यासाठी....!!!!

यावेळी आम्ही चार लंगोटी मित्र जमलो होतो. नितेश सावंत, अरुण जाधव, विनायक भोसले आणि मी... ठरल्याप्रमाणे दिवा जंक्शनवरून 'दिवा-सावंतवाडी पेसेंजेर' हि कोकणातील चाकरमान्यांची जिवाभावाची आणि स्वस्तात मस्त प्रवासाचा अनुभव देणारी रेल्वेगाडी पकडली. गाडीत जास्त गर्दीही नव्हती. चक्क विंडो सीट्स रिकाम्या असतानाही आम्ही दरवाज्यात जाऊन बसलो. तुम्ही म्हणाल वेड वगैरे लागलाय की काय?? चक्क विंडो सीट्स नाकारलीत??!!... तसच काहीस समजा.. कारण गाडीच्या दरवाजात बसून निसर्ग अनुभवत, आपल्या मित्राबरोबर जुन्या खोडकर आठवणींना उजाळा देत, साथ में एक कटींग चाय आणि वडापावचा आस्वाद घेत आणि सोबतीला आपल्या आवडत्या गाण्यांची प्लेलिस्ट ऐकत प्रवास करणे या सारख परफेक्ट कॉम्बिनेशन नाही आणि तो संपूर्ण प्रवास **म्हणजे एखाद्या स्वर्गीय अनुभवापेक्षा कमी नाही. (हा खुळा अनुभव कधी घेतला नसेल तर पुढच्या वेळेस नक्की ट्राय करा....**)

बरं तर शेवटी 'दरवाजा राइड' चा अनुभव घेत आमचे 'नागोठणे' स्टेशनवर आगमन झाले. हे स्टेशन कोकण रेल्वेच्या मार्गावर आहे.

प्रथम पालीच्या बल्लाळेश्वराचे दर्शन घेऊन मग सुधागडाकडे जायचे असल्याने आणि गडावरच रात्र काढण्याचे आधीच ठरवले असल्याकारणाने आम्हाला घाई नव्हती. मस्तपैकी थोडा वेळ स्टेशनवर टाईमपास करून आम्ही पालीच्या दिशेने कूच केले. नागोठणे स्टेशनवरून पालीला शेअर सिक्ससीटरने (डमडमने) पोचता येते. पाली गावाला भेट देण्याची हि माझी तिसरी वेळ होती.

पालीला उतरताच समोरच सरसगड उभा, त्याला पाहताच त्याच्या अंगाखांद्यावर घालवलेल्या आठवणी जाग्या झाल्या. दोनदा सरसगडला भेट दिल्यानंतरही त्याचे आकर्षण तिळमात्र हि कमी झाले नव्हते. त्याच्या कातळातल्या पायऱ्या पुन्हा एकदा खुणावू लागल्या आणि पुन्हा एकदा सरसगड सर करण्याची इच्छा मी इतरांना बोलून दाखवली, पण मला अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने मनोमनच सरसगडाची माफी मागितली.

अखेर पालीच्या बल्लाळेश्वराचे दर्शन घेऊन आणि दुपारच्या स्वादिष्ट महाप्रसादाचा लाभ घेऊन पाली एसटी आगाराच्या दिशेने निघालो. तेथून तीन वाजताची ठाकूरवाडीला जाणारी एसटी पकडली.

पाली ते ठाकूरवाडी हे अंतर जेमतेम १० किमी आहे. पण रस्त्याच्या दुरावस्थेमुळे हेच अंतर पार करायला दीड तास लागला. ठाकूरवाडीत उतरताक्षणी समोर पसरलेली लांबलचक आणि अवाढव्य डोंगररांग आपले लक्ष वेधून घेते. या गावात विकासाचा अभाव प्रकर्षाने जाणवतो.

(ठाकूरवाडी गावातून दिसणारी सुधागडची दर्शनी बाजू)

एका शाळकरी मुलाला गडावर जायचा रस्ता विचारून आम्ही गड चढण्यास सुरवात केली. संध्याकाळची वेळ असल्याने चढताना जास्त कष्ट पडत नव्हते.



अवघ्या अर्ध्या तासात पहिला टप्पा पार करून आम्ही प्रसिद्ध अश्या लोखंडी शिडी जवळ आलो. जुन्या शिडीची अवस्था फारशी ठीक नसल्याने आणि खाली असलेल्या खोल दरीमुळे नवीन शिडी बसवण्यात आली आहे.

दोन्ही बाजूला खोल दरी असल्याने धुक्यात चुकून तोल जाऊन कोणताही अपघात होऊ नये म्हणून या ठिकाणी रेलिंग बसवण्यात आली आहे.

येथून सुधागडाच्या टकमकटोकाचे पहिले दर्शन होते. रायगडावरील टकमकटोकात आणि या टकमकटोकात बरेच साम्य आहे.

इथून पुढे मात्र दाट जंगलातली वाट आहे.

पुढे दीड तासाची पायपीट करून आम्ही गडाच्या बुलंद दरवाज्याजवळ पोचलो. येथून काळ्या कातळातच कोरून काढलेला भव्य बुरुज नजरेस पडतो.



वर जाण्यासाठी पायऱ्या चढून जाव्या लागतात. गडावर जत्रेच्या वेळेस येणाऱ्या भाविकांसाठी आणि वर्षभर ट्रेकर्स मंडळींची रेलचेल असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव नवीन पायऱ्यांचे बांधकाम केले आहे. तसेच दोन्ही बाजूला रेलिंग्ज लावलेल्या आढळतात.

त्या पायऱ्या चढून आम्ही गडात प्रवेश केला. आणि एका सपाट पठारावर येऊन पोचलो. गडावर बुरुजाच्या उजव्या बाजूला चोरदरवाजा, बुरुज आणि तटबंदी नजरेस पडते.



©DalviVishalGiriNaad

(गडावरची चोरवाट)

तिथे थोडा वेळ आराम केल्यावर आम्ही पुन्हा चढण्यास सुरवात केली आणि काही वेळातच सुधागडाच्या माथ्यावर आमचे पाय टेकले. गडाचा माथा म्हणजे एक विस्तीर्ण पठार आहे. सगळीकडे गवताच रान माजलेल नजरेस पडल. उजव्या बाजूस खोल दरी होती. आणि समोर विस्तीर्ण पर्वतरांगा पसरलेल्या होत्या.

सुधागडावरून सभोवतालचे सहयवैभव मनाला पुरत वेडं करून सोडतं. पश्चिमेला कातळीसौंदर्याने नटलेला ‘तैलबैला’ लक्ष वेधून घेतो.

तर 'कोराईगड-घनगड आणि सह्याद्रीच्या मुख्य रांगेचे अगदी जवळून प्रेक्षणीय दर्शन होते. गडाच्या दक्षिण दिशेला टकमकटोक आहे. त्याला 'बोलता कडा' (इकोपॉइंट) असही म्हणतात. संध्याकाळची वेळ असल्याने टकमकटोकावर भन्नाट वारा सुटला होता. त्याक्षणी हरिश्चंद्रगडावरील कोकणकड्याची आठवण आली.

गडावर अनेक ठिकाणी उध्वस्त आणि पडक्या वास्तुंचे अवशेष पाहायला मिळतात. गडावरील चोरवाटा, चोरदरवाजा, घोडेपागा, दारूची कोठारे, धान्याची कोठारे हत्तीमाळ, ह्या साऱ्या वास्तू अगदी थक्क करून सोडतात.

गडावर अनेक पाण्याची तळी आहेत ज्यातील पाणी पिण्याजोगे आहे. गडाच्या एका टोकाला महादेवाच एक छोटस मंदिर आहे. त्याच्या मागे खोल दरी पाहून क्षणभर मनात धडकीच भरली.

©DalviVishalGiriNaad

थोडसं पुढे गेलो आणि एक भल मोठ तळ नजरेस पडल. कोण्या ट्रेकिंग ग्रुपने तिथे कॅम्प उभारला होता.

या सर्व ठिकाणांना धावती भेट देऊन आम्ही शक्य तितक्या लवकर पंतसचिव वाड्याकडे निघालो. कारण एव्हाना काळोख होण्यास सुरवात झाली होती. आणि आम्हाला रात्री झोपण्याची व्यवस्था हि करायची होती. झपाझप पाऊले टाकीत आम्ही पंतसचिव वाड्याजवळ पोचलो. या वाड्यालाही एक इतिहास आहे. चोसोपी आकाराचा हा वाडा इसवीसन १७०५ साली बांधला गेला. वाड्याला दोन दरवाजे असून मोठा ऐसपैस ओटा आहे.

समोर अंगणात पाणी ठेवण्यासाठी रांजण आणि मसाला वगैरे कुटण्यासाठी एक दगडी वरवंटा दिसला. आत दोन खोल्या असून त्यात गडावर राहायला येणाऱ्यांसाठी भांडी आणि काही अंथरुणाची सोय आहे. वाड्यात एकवेळेस ५० जणांची राहण्याची व्यवस्था होऊ शकते.

वाड्यासमोरच कार्यक्रमावेळी वापरण्यासाठी एक मोठी खोली बांधण्यात आली आहे. वाड्याच्या बाजूलाच एक वयस्कर जोडप राहत. गडाची देखरेखही तेच करतात. तिथून पुढे आम्ही भोराई मातेच्या मंदिराजवळ जाऊन पोचलो. मंदिरासमोर एक दीपमाळ दिसली ज्यावर एक हत्ती कोरलेला आहे आणि त्याने ती दीपमाळ आपल्या पाठीवर धरून ठेवली आहे.

आम्ही मंदिरात प्रवेश केला. मातेच दर्शन घेतलं आणि आजची रात्र मंदिरातच काढण्याच सर्वानुमते ठरलं. आणि आम्ही तयारीला लागलो. एव्हाना बाहेर काळोख झाला होता. इतक्यात आमची भेट मंदिरातल्या पुजाऱ्याशी झाली. मुळचा झाशीचा असलेला हा पंडित गेली अनेक वर्ष गडावरच देवीची सेवा करत आपलं आयुष्य घालवतो आहे. त्यांनी आमची आपुलकीने विचारपूस केली आणि आमच्या जेवणाची व्यवस्था करण्यासही ते तयार झाले आणि आमच्या समोरचा सगळ्यात मोठा प्रश्न दूर झाला. गडावर राहणाऱ्या त्या आजी-आजोबांना सांगून त्यांनी आमच्या जेवणाची सोय केली. आणि पाहिजे असल्यास मंदिरापेक्षा वाड्यासमोर नवीन बांधलेल्या खोलीत झोपण्यास सांगितलं आणि त्या खोलीत लाईट असल्याचे कळताच आम्ही मंदिरात झोपण्याचा आमचा विचार लगेचच बदलला आणि साऱ्या सामानासकट त्या खोलीत आलो. खोली बरीच मोठी होती. त्या पुजाऱ्याने वाड्यातून चटई आणि अंथरूने आणून दिली. आणि निश्चिंतपणे राहण्यास सांगितले. या सर्व गोष्टींची आम्ही अजिबात कल्पना केली नव्हती. एखाद्या परीकथेतल्या गोष्टीप्रमाणे आम्हाला न मागताच सार काही मिळत होत. आणि आम्ही हि हावरटासारखे सगळ काही घेत होतो.

(इतकी ऐसपैस खोली नाकारण्याची कोणाची बिशाद!!!!)

थंडीचा जोर वाढल्याने आम्ही स्वेटर्स वगैरे घालून आत खोलीतच आराम करू लागलो. पण झोप कसली लागतेय!! म्हणून थोड वेळ पत्ते खेळत बसलो. रात्री ८ च्या सुमारास आजीबाईंनी आम्हाला जेवण वाढलं. जेवण अगदी साध पण रुचकर होत. जेवणात भाकरी, भात, बटाट्याची भाजी, डाळ आणि लोणचे असा फक्कड बेत होता. संध्याकाळ पासून पोटात काहीही उतरलं नसल्याने आम्ही जेवणावर आडवा हात मारला. आणि तृप्तीचे ढेकर दिले.

आता जेवण झाल्यानंतर पुढे काय करायचे हा यक्षप्रश्न आमच्यासमोर होता. कारण नवीन वर्षाच स्वागत करण्यासाठी अजून तीन तास बाकी होते. ते पुजारीबाबा आणि आजीआजोबा एव्हाना झोपीही गेले होते. जरा बाहेर फेरफटका मारून आलो तर सगळीकडे स्मशानशांतता पसरली होती. डिसेंबर महिना असल्याने कडाक्याच्या थंडीने आम्ही सगळे कुडकुडतच होतो, म्हणून छानपैकी शेकोटी पेटवून शेकत बसलो. सोबतीला जुन्या हिंदी गाण्यांचा साज होताच...

सहज आकाशाकडे नजर गेली आणि पाहिले, ते तर आधीपासूनच ताऱ्यांच्या रोषणाईने नटून नवीन वर्षाच्या आगमनासाठी सज्ज होते.

अखेर ती वेळ येऊ घातली. अरुण आणि विनायकने आधीच मॅग्गी तयार करून ठेवली होती. आणि आमची इतर तयारही हि झाली होती. अब तो बस इंतजार था तो उस हसीन लम्हे का !!! अखेर तो ‘हसीन लम्हा’ आला आणि आम्ही जोरदार आरोळी ठोकली.

‘हैप्पी न्यू यिअर’... ‘बाय बाय २०१४’.... ‘वेलकम२०१५’..... ’छत्रपती शिवाजी महाराज की जय’....जय भवानी जय शिवाजी... जय सह्याद्री.....सुधागडाचा विजय असो!!!

आमच्या आरोळ्यांनी काही क्षणांपुरती का होईना पण त्या शांततेला भेदून टाकल. त्याक्षणी कधी नव्हे ती मनातून आरोळी ठोकली गेली.

मी येतानाच केकच एक पाकीट बरोबर आणल होत. तो केक एकमेकांना भरवून आम्ही न्यू यिअर सेलीब्रेट केला. त्यानंतर मॅग्गीचा बेत होताच की!!! नेहमी पार्ट्यांच्या नावाखाली केलेल्या सेलीब्रेशनने आम्हाला फक्त क्षणिक आनंद मिळायचा. पण समाधान मात्र नाही. आता केलेलं सेलीब्रशन अतिशय साधं पण अतुलनीय समाधान देणार होत. खरतर ते सेलिब्रेशन नव्हतच...तो होता जल्लोष आपल्या सवंगड्यांसोबत केलेला, तो होता जल्लोष निसर्गासोबत साजरा केलेला, तो होता जल्लोष त्या क्षणाचा...तो होता जल्लोष एका नवीन सुरवातीचा....

नवीन वर्षाच दणक्यात ‘गिरीनाद स्टाईलने’ स्वागत केल्यांनतर मात्र आम्ही स्वतःला निद्रादेवीच्या अधीन केल. पहाटे लवकरच जाग आली. पटापट सर्व समान आवरून साफसफाई करून आम्ही बाहेर पडलो. एकवार चौफेर नजर टाकली. सुर्यादेवांची तांबडी छटा हळूहळू उगवत होती. धुक्यातून वाट काढीत कोवळी किरणे या मातीत समरस होत होती. संपूर्ण विश्वावर नयनरम्य रंगाची उधळण चालू होती. संपूर्ण निसर्गच जणू नवीन वर्षाचा सोहळा साजरा करीत होता. नवीन वर्षाची पहिली नवीन पहाट ज्यांनी पाहिली ते कृतार्थ झाले अस मी म्हणेन, इतकं ते दृश्य सुंदर होत.....सुधागडाच्या साक्षीने येत्या नवीन वर्षात जास्तीत जास्त आनंदी आणि समाधानी राहण्याचा आणि इतरांनाहि आनंदी ठेवण्याचा संकल्प आम्ही सोडला. आणि परतीच्या प्रवासाला लागलो....

एवढ्या सुंदर अनुभवानंतर दिल तो अगदीच गार्डन गार्डन हो गया. पण या थकलेल्या शरीराचं काय? त्यालाही तर फ्रेश करायला हव की नाही. अशा वेळेस या थकलेल्या शरीराला गरम पाण्यात निवांतपणे पडून राहण्यास मिळाल तर......??? हो खरच... अशी तरतूद आहे आणि ती हि अगदी फुकट. विश्वास बसत नाहीये. तर मग निघायचं पाली पासून अवघ्या २ किमी अंतरावर असलेल्या उन्हेरे गावाच्या गरम पाण्याच्या कुंडाला भेट दयायला...

बल्लाळेश्वराच्या मंदिरापासून पायी फक्त दोन किमीच अंतर कापल्यावर उन्हेरे गाव लागत. येथील विठ्ठल रखुमाई मंदिराच्या परिसरातच गरम पाण्याचे झरे आहेत. या मंदिराचा नुकताच जीर्णोद्धार करण्यात आला असून मंदिर अतिशय रेखीव आणि सुरेख भासते.

रामायणात श्रीरामाने देवी सीतेच्या स्नानासाठी बाण मारून हि कुंड तयार केल्याची आख्यायिका आहे. इथे एकूण तीन कुंड आहेत. पुरुषांसाठी वा स्त्रियांसाठी वेगवेगळ्या कुंडांची व्यवस्था आहे. स्नान करताना साबण लावणे, चूळ भरणे, कपडे धुणे आदी प्रकार करण्यास सक्त मनाई आहे. हे पाणी गंधकमिश्रित असून यात स्नान केल्यावर त्वचेचे वा वाताचे विकार बरे होतात असा गावकऱ्यांचा दावा आहे. या पाण्यात एकदा शिरल्यावर पुन्हा बाहेर यावेसे वाटतच नाही.......

अशाप्रकारे एका सुंदर ट्रेकची सांगता झाली. पण मन मात्र केव्हाच पुढच्या प्रवासाच्या प्लांनिंगमध्ये व्यस्त झाल होत...........

आमच्या संपूर्ण प्रवासाची एक छोटी फिल्म बघायची इच्छा असेल तर माझ्या युटयूब चैनेलला नक्की भेट द्या.

vishal dalvi youtube channel

-विशाल दळवी

ई साहित्य प्रतिष्ठान

मित्रहो

मी माधुरी अरविंद नाईक.

ई साहित्य प्रतिष्ठानचा दुर्ग भ्रमण व प्रवासवर्णनांचा विभाग मी सांभाळते.

मला आज तुमच्याशी थोड बोलायच आहे. तुम्ही माझे सातारा- सज्जनगड पुस्तक तुम्ही वाचले आहे. यापुर्वी तुम्ही मी लिहीलेली मालवण – सिंधुदुर्ग, तसेच खांदेरी उंदेरी, माहुलीगड ही पुस्तकंही वाचली असतीलच. त्यामध्ये मी किल्ल्यासोबत थो्डी आजुबाजुची फिरण्याची ठिकाणे देखिल दिली आहेत. या पुस्तकांचा उद्देश म्हणजे जर कोणी तसे नियोजन करत असेल तर त्याला मदत व्हावी असा माझा हेतु आहे. पण त्यात पण शेवटी बरीच ठिकाणे राहुन जातात. तर आता ती मदत तुम्ही मला करावी अशी मी अपेक्षा करत आहे. आज प्रत्येकजण कुठे ना कुठे फिरत असतोच. आणि हातात तर मोबाईल असतोच त्यामुळे फोटो काढणे हे आलेच. तर तेथिलच फोटो तुम्ही आम्हाला पाठवा. ते अगदी प्रोफ़ेशनल हवेतच असे काही नको. पण तेथिल सद्यस्थिती तर आपल्याला कळेल. ठिकाणे म्हणजे काही शिमला, मनाली, जम्मु काश्मिर , लेह लडाख नको. तर अगदी साधी साधी ठीकाणे आम्हाला लिहुन पाठवा. कोणी कुठे नाही गेले तरी आपल्या गावी तर सगळेच जातात.

प्रत्येक गावामध्ये एक सुंदर मंदिर असते. त्याची वर्षातुन एकदा यात्रा असते. पालखी निघते. उत्सव साजरा केला जातो. काहीतरी गावात प्रथा असते. त्याची माहिती आम्हाला कळवा. हे वाचायला मला फार मजा येईल. आणि अशा आवडीचा देखिल एक वर्ग असेलच त्यालाही मदत होईल. ते तुम्ही आम्हाला नक्की कळवा. आपण सर्व मिळुन त्याचा एक ग्रंथ बनवुया.

आता बघा मी मालवण म्हणजे सिंधुदुर्ग किल्याविषयी लिहले आहे. पण मला पुर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्याविषयी माहिती हवी आहे. ते एकटी तर मी करु शकत नाही. त्यासाठीच मला तुमची मदत हवी आहे. हे पुस्तक जरी पब्लिश झाले असले तरी. अजुन माहिती जमा झाल्यास ती आपण आपल्या वेबसाईटवर कायमस्वरुपी ठेवु शकतो. हे झाले एकट्या सिंधुदुर्गविषयी तेच आपल्याला सर्व जिल्ह्याविषयी करायचे आहे. आता सातार्‍यातील पण बर्‍याच स्थळांची मी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. पण फिरण्यासारखे अजुन बरेच काही आहे. ते तुम्ही आम्हाला कळवा.

आमच्या ग्रुपमध्ये विशाल दळवी, भास्कर नारकर, पंकज घारे, स्वप्नील कारळे, नचिकेत जोशी, संकल्प चौधरी असे अनेकजण आपआपली ट्रेक्स करून झाले की लगेच त्याबद्दलची माहिती

कळवतात व त्यांचे पुस्तक बनत जाते. महाराष्ट्रातल्या अशा किल्ल्यांबद्दलच्या पुस्तकांचे अर्धशतक आम्ही लवकरच पूर्ण करू. या अभियानात तुमची फ़ार फ़ार गरज आहे. तुम्ही लेखक व्हा. छायाचित्रकार व्हा.

फार काही लिहण्याची गरज नाही. जसे की बघा माझे माहेरचे गाव नांदुर आहे. ते पुणे - नाशिक महामार्गापासुन ३ कि.मी. आत आहे.

१. तिथे रामाचे सुंदर मंदिर आहे. तिथे रामनवमीला मोठी यात्रा असते.यात्रा दोन दिवस असते. पहिल्यादिवशी रामजन्म साजरा केला जातो. संपुर्ण गावात जेवण असते. ज्या स्रियांना लवकर मुल होत नसेल त्या मोठ्या श्रद्धेने रामाच्या पाळण्याची दोरी धरतात.

२. दुसऱ्या दिवशी बैलगाड्यांची शर्यत असते. ज्याने कोणी आतापर्यत अशी शर्यत बघितली नसेल त्याच्यासाठी झाला हा नविन पॉइंट.

३. माझ्या गावात गहु, बाजरी, काकडी, गाजर, बटाटे,टॉमॅटो मका, वांगी, तुर, हरभरा,ही पिके होतात.

४. गावात एक डोंगरावर खंडोबाचे आणि शनीचे मंदिर आहे. खंडोबाच्या डोंगरावर दर रविवारी आणि पौर्णिमेला गावकरी खंडोबाची तळी भरतात.

५. गावात एक तळे आहे. तिथे पावसात फार छान वाट्ते. बाजुला सर्व हिरवेगार होते. बाजुला एक छोटे मंदिर आहे. कशाचे ते माहित नाही. पण आता मी नक्की शोध घेईल. मंदिर आहे हे कळाले ना बस तर झाले आपले काम.

जेव्हा केव्हा पुण्याचे पुस्तक बनेल तेव्हा ही माहिती मला उपयोगी नक्की पडेल.

बदलापुर - कोंडेश्वर धबधबा आणि तिथे जाताना दिसणारा निसर्ग :-

घाटकोपर – खंडोबा मंदिर :-

घाटकोपरला डोंगरावरती खंडोबाचे मोठे मंदिर आहे. दर रविवारी तिथे भरपुर लोक जातात. तिथे जाणारा रस्ता थोडा खराब असला तरी. वरती गेल्यावर फार छान वाटते. वरुन बरीच मुंबई बघता येते. तसेच विमानतळावर उतरणारी- उडणारी विमाने पण येथुन दिसतात.

सायन :- सायन म्हणजे शिव येथे ३५ एकरावर महाराष्ट्र नेचर पार्क आहे. इथे फुलपाखरु उद्यान देखिल विकसित केले आहे. धारावी बस डेपो समोर हे पार्क आहे. पार्कला नाममात्र ५ रुपये प्रवेश फी आहे. हे किती जणांना माहित आहे. हा आता जे तिथे कामानिम्मित जात असतील त्यांना महित असेल.

बस असेच काही तुम्हाला लिहुन पाठवायचे आहे, आणि जमल्यास एखादा फोटो. एवढे तर नक्कीच करु शकता ना? त्या सर्व माहितीचे व्यवस्थित संकलन करण्याचे काम माझे.

माधुरी अरविंद नाईक.

Madhuri.jadhav26@yahoo.co.in

esahity@gmail.com

श्री लक्ष्मी पार्क फेज -२
बिल्डिंग नंबर-५,
रुम नं -६०४, लो्कमान्यनगर, ठाणे- पच्छिम- ४००६०६
mo. no.-9820234891